# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१९ – २०

### जयकर व्याख्यानमाला

सकाळ

## जयकर व्याख्यानमाला राजगुरुनगर येथे उत्साहात

**राजगुरुनगर, ता. ३१ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्यातर्फे बहि:शाल मंडळाअंतर्गत येथे नुकतेच तीनदिवसीय डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते.

पहिले पुष्प प्रकाश पवार यांनी 'सौंदर्य मनाचे' या विषयावरच्या व्याख्यानाने गुंफले. दुसरे पुष्प नवनाथ लोंढे यांनी गुंफले. शेवटचे पुष्प डॉ. जयसिंग गाडेकर यांनी गुंफले. मराठी गझल रचना आणि त्यातले बारकावे त्यांनी सांगितले. व्याख्यानमालेचे आयोजन प्रा. जी. एम. धुमाळ, प्रा. पी. आर. जगताप, प्रा. के. एम. नितनवरे यांनी केले. त्यांना प्राचार्य डॉ. एच. एम. जरे यांचे मार्गदर्शन लाभले.

Pune, District-Today
01/01/2020 Page No. 4

पुढारी

# डॉ. जयकर व्याख्यानमाला उत्साहात

**राजगुरुनगर :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने बहि:शाल मंडळांतर्गत नुकतीच डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला घेण्यात आली. या वेळी खेड पंचायत समितीचे माजी विकास अधिकारी प्रकाश पवार यांनी सौंदर्य मनाचे या विषयावर व्याख्यानमालेचे पहिले पुष्प गुंफले. त्यांनी दैनंदिन जीवन सुखकर करण्यासाठी मनाचे सौंदर्य उपयुक्त असल्याचे सांगितले. तर शासनाचे प्रयोगशाळा तंत्रज्ञ नवनाथ लोंढे यांनी त्यांच्या व्याख्यानात गाणे आणि कवितेच्या माध्यमातून समाजप्रबोधन कसे करता येते याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. व्याख्यानमालेचे शेवटचे पुष्प डॉ. जयसिंग गाडेकर यांनी गुंफले. व्याख्यानमालेचे आयोजन बहि:शाल मंडळाचे समन्वयक प्रा. जी. एम. धुमाळ, प्रा. पी. आर. जगताप, प्रा. के. एम. नितनवरे यांनी केले. त्यांना प्राचार्य डॉ. एच. एम. जरे यांचे मोलाचे मार्गदर्शन केले.

My Gramin Edition
28 Dec, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

लोकमत

# राजगुरु महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला

राजगुरुनगर : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि हुतात्मा राजगुरु महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने बहि:शाल मंडळांतर्गत २१ ते २४ डिसेंबरदरम्यान डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले.

या व्याख्यानमालेतील पहिले पुष्प गुंफण्यासाठी प्रमुख वक्ते म्हणून खेड पंचायत समितीचे माजी विकास अधिकारी प्रकाश पवार हे उपस्थित होते, त्यांनी सौंदर्य मनाचे या विषयावर व्याख्यान दिले. दैनंदिन जीवन सुखकर करण्यासाठी मनाचे सौंदर्य उपयुक्त असल्याचे त्यांनी सांगितले.महाराष्ट्र शासनाचे प्रयोगशाळा तंत्रज्ञ नवनाथ लोंढे यांनी त्यांच्या व्याख्यानात गाणे आणि कवितेच्या माध्यमातून समाज प्रबोधन कसे करता येते या बद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. व्याख्यानमालेचे आयोजन बहि: शाल मंडळाचे समन्वयक प्रा. जी. एम. धुमाळ तसेच समिती सदस्य प्रा. पी. आर. जगताप, प्रा. के. एम. नितनवरे यांनी केले त्यांना प्राचार्य डॉ. एच. एम. जरे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

Hello Pune Gramin
Page No. 9 Dec 28, 2019
Powered by: erelego.com

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख